# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


**प्रेसनोट क्र.६० दिनांक २४/०६/२०२१**

## जबरी चोरी करणा-या सराईत आरोपीतांस तलासरी पोलीसांकडुन तात्काळ अटक

दिनांक २४/०६/२०२१ रोजी ००.१५ वा. चे सुमारास तलासरी पोलीस ठाणे हद्दीत मुंबई अहमदाबाद महामार्गावर मुंबई वाहीनीच्या बाजुस ओएफसी टेलीफोन केबल वायर जमीनीत टाकण्यासाठी ट्रेकर मशीनने चेकींग करीत असतांना ०३ संशयीत इसमांनी आपसात संगणमत करुन मोटार सायकल वरुन येवुन फिर्यादी राजेश कल्याण चौधरी, वय २६ वर्षे यास पाठीमागुन मिठी मारुन फिर्यादीच्या पॅन्टच्या डाव्या खिशातील १२,५००/- रुपये रोख रक्कम व १०,००० रुपये किंमतीचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल जबरीने चोरुन घेवुन पळुन गेला. नमुद आरोपीत हे पळुन जात असताना पोलीसांनी व इतर साक्षीदारांनी आरोपी क्र. १. याचा पाठलाग करुन अटक करण्यात आलेले आहे. यावरुन तलासरी पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. १३२/२०२१ भा.दं.वि.सं. कलम- ३९२, ३४ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे. गुन्हयातील सर्व मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

आरोपी क्र. १. याची कसुन चौकशी केली असता वरील गुन्हयातील आरोपी नं.२ व ३ याव ठावठिकाणा प्राप्त करुन आरोपी क्र. २ व ३ यांस अटक करण्यात आली. नमुद आरोपीत यांचेकडे कसुन चौकशी केली असता, त्यांचे पुर्वीचे रेकॉड पाहिले असता त्यांचेविरुध्द पालघर जिल्हयात व दादरा नगर हवेली येथे खालीलप्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि.क्रमांक | कलम |
|---|---|---|---|
| १. | तलासरी पोलीस ठाणे | ९४/२०१७ | भा.दं.वि.सं.क.३९५, ३४२, ३२३ सह आर्म ॲक्ट ३/२५ प्रमाणे |
| २. | तलासरी पोलीस ठाणे | ५५/२०१७ | भा.दं.वि.सं.कलम-४५४, ४५७,३८०प्रमाणे. |
| ३. | वालीव पोलीस ठाणे | ८६०/२०१९ | भा.दं.वि.सं.कलम-२२४ प्रमाणे. |
| ४. | खानवेल पोलीस ठाणे | २६/२०२० | भा.दं.वि.सं.कलम-३९५, ३०८ प्रमाणे. |
| ५. | खानवेल पोलीस ठाणे | २८/२०२० | भा.दं.वि.सं.कलम-४५७,३८०,३४ प्रमाणे. |
| ६. | खानवेल पोलीस ठाणे | ०७/२०२१ | भा.दं.वि.सं.कलम-३०८ प्रमाणे |
| ७. | खानवेल पोलीस ठाणे | ३१/२०२१ | भा.दं.वि.सं.कलम-४५७,३८० प्रमाणे. |
| ८. | खानवेल पोलीस ठाणे | ३७/२०२१ | भा.दं.वि.सं.कलम-३९४ प्रमाणे. |

सदरची कामगिरी ही पोलीस निरीक्षक श्री. अजय वसावे, प्रभारी अधिकारी तलासरी पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली पोउनि/वारुंगसे यांनी व तलासरी पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

Scanned with CamScanner